<u>शपथेवर सर तपास सुरु</u> .......

**<u>सरतपास अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. पी.आर.पांडे वकील साहेब</u>**

६. मी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी विभाग नियंत्रक रा.प., यवतमाळ यांना दि. २९/११/२०२२ रोजी न्यायालयीन आदेशाची पुर्तता करण्याकरीता दिलेले पत्राची स्थळप्रत दाखविली त्यावर माझी सही असून सदर पत्र त्यांना मिळल्याची पोच आहे त्यास **<u>नि.क्र. १८</u>** देण्यात येते.

<u>सरतपास पुर्ण</u>

**<u>उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. यु. के. पांडे साहेब</u>**

७. मी दि.३०/११/२०१९ रोजी सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र. १८ वरील पत्र हे मी दि. २९/११/२०२२ रोजी गैरअर्जदार यांना दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. १८ वरील पत्र देण्यापुर्वी त्यामधील मागणीबाबत त्या आधी गैरअर्जदार यांना पत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याआधी दिलेले पत्र मी प्रकरणात दाखल केले नाही. सदर पत्र प्रकरणामध्ये न दाखल करण्याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर पत्र मी गैरअर्जदार यांना दिले नाही म्हणून ते मी प्रकरणामध्ये दाखल केलेले नाही.

८. मी सूरुवातीला वाहक म्हणून कामगीरीवर लागलो. हे म्हणणे खरे आहे की, एस.टी. महामंडाळामध्ये बसेसच्या संख्येपेक्षा चालक वाहकाची संख्या जास्त असते. हे म्हणणे खरे आहे की, एस.टी. महामंडळाच्या नियमानुसार एका बसचे एका दिवसाला रनींग साधारणता ५०० कि.मी. एवढे होणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, चालक व वाहक यांना जलद बसेस असेल तर ३०० कि.मी. व साधारण बस असेल तर ६ तासांचा प्रवासवेळ करणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, एका बसवर साधारणता चार

चालक–वाहक एका दिवसाला लागतात. हे म्हणणे खरे आहे की, जे कायम स्वरुपी कर्मचारी असतात त्यांना आधी कामगीरी दिली जाते व रोजंदारी कर्मचा–यांना बसेस व फे–यांच्या उपलध्दतेनुसार कामगीरी दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, रोजंदारी कर्मचा–यांना कामगीरी नसते त्या दिवशी त्यांची हजेरी नसते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांमुळे रोजंदारी कर्मचा–यांची एका वर्षामध्ये १८० दिवस कामगीरी होत नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, मला दि. १९/११/१९८८ रोजी डेली पेड ग्रुप–२ मध्ये घेण्यात आले व त्यावेळेस मला बेसीक हे रु. ९००/– देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की मला दि. २२/०४/१९९० रोजी वेतन वाढीनुसार माझे बेसीक रुपये ९१६/– करण्यात आले. हे मला आठवत नाही की,मला दि. २१/११/१९९१ रोजी वेतनवाढी नुसार माझे बेसीक रुपये ९३२/– करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दरवर्षी वेतन वाढ देण्यात आली आहे. हे मला आठवत नाही की, मला गणवेशाचा कापड कोणत्या वर्षापासून मिळाला. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळामध्ये जो दर महिण्याला आम्हाला पगार दिल्या जातो त्यांची पगार पावती आम्हाला दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदर पगार पावतीमध्ये मुळ पगार किती, महागाई भत्ता व इतर भत्ते किती देण्यात आले याबाबत नमुद असते. हे म्हणणे खरे नाही की, मला १९८८ पासून घरभाडे, गणवेश धुलाई भत्ता मिळत होता. हे म्हणणे खरे आहे की मला आठवडी सुट्टी मिळत होती. हे म्हणणे खरे आहे की, मला डेली पेड ग्रुप–२ वर घेण्यात आल्यानंतर फॅमीली पास देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, मला वैद्यकीय बील मंजूर होत होते. हे म्हणणे खरे आहे की मला डेली पेड ग्रुप–२ वर घेण्यात आल्यानंतर सेवानिवृत्ती पर्यंत वेतनवाढ देण्यात आल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सेवानिवृत्तीच्या वेळेत जो मुळ पगार व महागाई भत्ता होता त्यानुसार मला सेवनिवृत्ती नंतर उपदानाची व भविष्य निर्वाह निधीची रक्कम देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मला सेवानिवृत्तीनंतर डिसेंबर–

२०१९ मध्ये उपदानाची रक्कम रु.७,२५,११४/– मिळाली व त्यानंतर फेब्रुवारी–२०२१ रोजी सुधारीत उपदानाची २३,३९१/– एवढी रक्कम मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर–२०१९ मध्ये मला भ. नि. रक्कम रु. १२,५३,३३९/– एवढी रक्कम मिळाली. मी सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवानिवृत्तीचे लाभ मिळाले नसल्यामुळे या प्रकरणा व्यतिरिक्त दुसरे प्रकरण दाखल केले नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, वेळोवेळी एस.टी. महामंडळ व कामगार संघटणा यांच्यामध्ये करार होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, वेळोवेळी या सर्व बाबींची अंमलबजावणी होण्याकरीता महामंडळाची परिपत्रके निघत असतात. हे म्हणणे खरे आहे की सदर परिपत्रके ही सर्व कामगारांना लागू होत असतात. हे म्हणणे खरे आहे की महामंडळाची परिपत्रके मला सेवानिवृती पर्यत लागू होते. हे म्हणणे खरे आहे की मला महामंडळाचे वार्षिक वेतन वाढीबाबतचे परिपत्रके लागू होत होते. हे म्हणणे खरे नाही की सर्व परिपत्रकांची माझेबाबत अंमलबजावणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे प्रकरण दाखल केले असून खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

**फेरतपासणी काही नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीमती रु.वि. मेटे)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, यवतमाळ

स्थळ : यवतमाळ
दिनांक : १७.११.२०२५